Gokhale Education Society's

# SMRK-BK-AK Mahila Mahavidyalaya, Nashik.

## EVENT REPORT FORMAT

| | |
|---|---|
| Name of the Programme | **Abhijat Marathi Bhasha Saptah (अभिजात मराठी भाषा सप्ताह)** |
| Day and Date | Friday, 03th Oct. 2025 to Wed. 08 Oct. 2025 |
| Organising Committee/Department (Mention Collaborating Agency) | **मराठी विभाग**<br>**Dept. of Marathi** |
| Time | 09.30 a.m to 1.00 p.m |
| Topic /Theme | **1) मुक्त चर्चा – मी आणि माझी भाषा**<br>**2) चित्रपट नटसम्राट आस्वाद – साहित्याची भाषा व चित्रपटाची भाषा गट चर्चा**<br>**3) मराठी शुद्धलेखन कार्यशाळा**<br>**4) मराठी भाषेबद्दल न्यूनगंड का विषयावर अतिथी व्याख्यान**<br>**5) मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटन** |
| Resource Person/s | 1. डॉ. सायली आचार्य, मराठी विभागप्रमुख<br>2. मा. डॉ. वृंदा भार्गवे, ख्यातनाम पत्रकार, लेखिका, |
| Students and staff attended the Programme | **Day 1 – 3/10/2025 – 20 students – 04 Staff**<br>**Day 2 – 4 /10/2025 – 38 students – 10 Staff**<br>**Day 3 – 6/10/2025 - 36 students – 7 Staff**<br>**Day 4 – 8/10/2025 – 18 Students – 18 Staff** |
| Brief Summary | शुक्रवार दि. ३ ऑक्टोबर २०२५ ते ९ ऑक्टोबर २०२५ या काळात शासन सर्वत्र अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा केला जातो. याचे औचित्य साधत गोखले एज्युकेशनच्या एस.एम.आर.के. महिला महाविद्यालयातील मराठी विभागाने विविध उपक्रमांचे आयोजन केले. ३ तारखेला मराठी विभागाच्या विद्यार्थिनींसाठी **"मी आणि माझी भाषा"** यावर मुक्तचर्चा घेण्यात आली. कु. दिव्या अहिरे, अमिषा लोखंडे व वैशाली मोरे या विद्यार्थिनींनी अभिजात मराठी भाषा विषयक भित्तीचित्र तयार केले. तर मोनिका भदाणे, मनिषा सनेर, दीपाली पटेकर, पूर्वा पवार, संध्या खिल्लारे, सविता माघाडे, वैशाली मोरे, खुशबू भरीत या विद्यार्थिनींनी गटचर्चेत आपला सहभाग नोंदविला. दि. ४ ऑक्टोबर २०२५ रोजी अभ्यासक्रमात असलेला **नटसम्राट चित्रपट** पडद्यावर दाखवून **साहित्याची भाषा व चित्रपटाची भाषा** या विषयावर मराठी विभागप्रमुख डॉ. सायली आचार्य यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले त्यानुसार विद्यार्थिनींमध्ये गटचर्चा घडवून आणण्यात आली. डॉ. उज्ज्वला |

लांडगे, डॉ. जयश्री शहाणे व ज्योती बाविस्कर यांनी विद्यार्थिनींशी मुक्त संवाद साधला. याप्रसंगी कलाशाखा समन्वयक व हिंदी विभागप्रमुख डॉ. सुरेश कानडे उपस्थित होते त्यांनीही चित्रपटाकडे डोळस वृत्तीने बघण्याची दृष्टी कशी बाळगावी यावर मार्गदर्शन केले.

सोमवार दि. ६ तारखेला मराठीसह इतर विषयांच्याही विद्यार्थिनींसाठी **मराठी शुद्धलेखन कार्यशाळेचे आयोजन** विभागाने केले होते. ओमकार म्हणण्यापासून कार्यशाळेचा आरंभ झाला. डॉ. उज्ज्वला लांडगे यांनी मुलींना यासाठी मार्गदर्शन केले. या कृतिसत्रात डॉ. सायली आचार्य यांनी मराठी शुद्धलेखनावर मार्गदर्शन केले. विविध शब्दांच्या उच्चाराचे खेळ, उच्चारण व्यायाम यावर भर देत त्यांनी आवाजातील चढउतार, योग्य त्या जागी विरामाचे महत्त्व सांगितले. तसेच भावनांच्या प्रकटीकरणासाठी विरामचिह्ने कसे काम करतात याचीही उदाहरणे दिली. विद्यार्थिनींपैकी डॉ. स्मिता मालपुरे, दीपाली पटेकर, नुपूर ओढेकर, मोहिनी गंधे, पल्लवी जगताप, पूर्वा पवार, पायल खरे, मनिषा सनेर या विद्यार्थिनींनी अनेक प्रश्नांची उत्तरे देत क्रियाशील सहभाग नोंदवला.

बुधवार दि. ८ ऑक्टोबर २०२५ रोजी अभिजात मराठी भाषा सप्ताहाचा समारोप झाला. याप्रसंगी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन प्रमुख अतिथी ख्यातनाम लेखिका, पत्रकार डॉ. वृंदा भार्गवे यांच्या हस्ते संपन्न झाले. त्यानंतर "मराठी भाषेबद्दल न्यूनगंड का ?" या विषयावर त्यांचे व्याख्यान आयोजित केले होते. भाषा हे साधन असते, साध्य नव्हे त्यामुळे मराठी माध्यमातून शिकणाऱ्या मुलांना मराठी भाषेबद्दल न्यूनगंड बाळगण्याचे काहीच कारण नाही. कारण मातृभाषेतून ज्ञान हे एखाद्या टिपकागदाप्रमाणे टिपता येते. भाषा ही साधन, संस्कृती, वारसाही असते त्यामुळे मातृभाषेविषयी न्यूनगंड न बाळगता तिचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. अर्थसघन असलेल्या मराठी भाषेला आपणच आवळून ठेवले आहे. यु ट्यूब, व्हॉटस्अप सारख्या समाजमाध्यमांनी, दूरदर्शनवरील असंख्य मालिका व इतर माध्यमांनी मराठी भाषा आंग्लाळली आहे, असे त्या म्हणाल्या. रील्समुळे जे सांगायचंय ते शब्दांशिवाय सेकंदात सांगितलं जातं त्यामुळे आता शब्दांची गरजच उरली नाही, सगळ्यांनी शब्दच वजा केलेत परिणामी शब्दभांडार वाढतच नाही. मराठी माध्यमात शिकलेल्या माणसाला इंग्लिश बोलणारी व्यक्ती आपल्यापेक्षा अधिक पुढे जाईल असे वाटते किंवा बिहारकडील भैय्याशी बोलताना आपण आधीच हिंदी वाक्यापासून संभाषण सुरू करतो, तेव्हा अशी भीती किंवा संकोच न बाळगता मराठीत संवाद साधायला हवा. अधिकाधिक सकस वाचन करणं, शब्दसंग्रह वाढवणं, अर्थासहित त्यातील रूपं जाणून घेणे आवश्यक आहे हे सांगताना त्यांनी मराठी

माध्यमात शिकून यशस्वी झालेल्या पोलीस महासंचालक सदानंद दाते, एमकेसीएल चे विवेक सावंत, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, सई ताम्हणकर, अतुल कुलकर्णी अशी अनेकांची उदाहरणे दिली. जयंत नारळीकरांनी शास्त्रज्ञ असूनही इंग्लिशमध्ये न लिहिता कितीतरी पुस्तके मराठी भाषेत लिहिली हे सांगत त्यांनी संत तुकाराम, संत रामदासांसह संपूर्ण साहित्याचा अवकाश मोजक्या परंतु प्रभावी शब्दात उलगडून दाखवला. समर्थ रामदासांच्या 'अभ्यासोनि प्रकटावे' या ओळीतच त्यांना विचारपूर्वक, अभ्यास करून, चिंतन करून बोलावे, जबाबदारीने बोलावे हे अभिप्रेत होते. 'अर्थेविणा पाठांतर कैसेया करावे' या संत तुकारामांच्या ओळीतच शब्दाचा अर्थ जाणून घेतल्याशिवाय मनाला येईल तसे, चुकीचे बोलणे, चुकीचे उच्चारण करणे कसे घातक आहे हे सांगताना त्यांनी अनेक इंग्रजी व मराठी बालकवितांची उदाहरणे दिली. इतर भाषा, तिच्यातील शब्दांचा अर्थ समजून न घेता वापरणे घातक. यापेक्षा आपली मातृभाषा आपल्याला अधिक सोपी असते, तिच्यातील सौंदर्य ओळखा, बालकवींच्या 'हिरवे हिरवे गार गालिचे' या पंक्तींतून एकाचवेळी रंग, स्पर्शसंवेदना आणि लय, नाद हे सौंदर्य निर्माण करण्याची कशी ताकद आहे ते समजून घ्या. कारण आपली भाषा जर मृत झाली तर आपली ओळख, आपली संस्कृती, साहित्यही मृत होईल. शासन स्तरावर अभिजात मराठी भाषेचा जागर करण्यास सांगितले गेले आहे परंतु ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या परंतु वर्षानुवर्षे अल्पशा अनियमित मोबदल्यात तासिका तत्त्वावरही मनापासून काम करणाऱ्या प्राध्यापकांचे प्रश्न सोडवावे, त्यांना नोकऱ्या द्याव्या तरच असे भाषेचे जागर करण्यात अधिक आनंद आहे असेही महत्त्वाचे प्रतिपादन त्यांनी केले. मराठी विभागातील अनेक विद्यार्थिनींनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे अनावरण त्यांच्या हस्ते झाले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर यांनी आपल्या मनोगतात मराठी भाषेला अभिजात भाषा म्हणून दर्जा मिळाला म्हणजे नेमके काय झाले व काय बदल यामुळे मराठी प्रांतात होणार आहेत, शिक्षणाच्या, संशोधनाच्या संधी कशा उपलब्ध होणार आहेत, विविध पुरस्कार योजना यामुळे अंमलात येत आहेत याविषयी मार्मिक माहिती दिली. मराठी विभागप्रमुख डॉ. सायली आचार्य यांनी प्रास्ताविकात सप्ताहातील झालेल्या उपक्रमांचा आढावा घेत उपक्रमात सहभागी व यशस्वी झालेल्या विद्यार्थिनींचे तसेच सहकारी प्राध्यापकांचे कौतुक केले व मान्यवरांचा परिचय करून दिला. मराठी विषयात विद्यापीठात पहिली आलेली सौ. सविता देसले तसेच सर्व उपक्रमांत सक्रिय विद्यार्थिनी पूर्वा पवार, दीपाली पटेकर, नुपूर ओढेकर, दिव्या अहिरे, अमिषा लोखंडे, वैशाली मोरे, मोहिनी वझे या विद्यार्थिनींचा सत्कार

| | |
|---|---|
| | याप्रसंगी करण्यात आला. याप्रसंगी मंचावर उपप्राचार्य डॉ. नितीन सोनगीरकर, समन्वयक डॉ. सुरेश कानडे, सौ. मैथिली लाखे व श्रीमती शोभा त्रिभुवन उपस्थित होते. विद्यार्थिनी कु. नगमा अन्सारी हिने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ. उज्ज्वला लांडगे यांनी आभार मानले. डॉ. जयश्री शहाणे, सौ. ज्योती बाविस्कर, डॉ. उज्ज्वला लांडगे यांनी कार्यक्रमाच्या आयोजन व यशस्वितेसाठी प्रयत्न केले. या कार्यक्रमास अनेक विभागप्रमुख, प्राध्यापक वृंद व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. |

डॉ. सायली आचार्य
मराठी विभागप्रमुख (प्र.)

डॉ. नितीन सोनगीरकर
उपप्राचार्य

डॉ. संध्या खेडेकर
प्राचार्या

## मराठी विभाग आयोजित

# अभिजात मराठी भाषा सप्ताह

## अभिजात मराठी भाषा सप्ताह ई - बॅनर



















दि. ३ ऑक्टोबर २०२५ रोजी मराठी विभागातील विद्यार्थिनींमध्ये मी आणि माझी भाषा यावर आयोजित मुक्तचर्चा प्रसंगी संवाद साधताना विभागप्रमुख डॉ. सायली आचार्य

दि. ३ ऑक्टोबर २०२५ रोजी मराठी विभागातील विद्यार्थिनींमध्ये मी आणि माझी भाषा यावर आयोजित मुक्तचर्चा प्रसंगी सहभागी विद्यार्थिनी व स्टाफ

दि. ४ ऑक्टोबर २०२५ रोजी नटसम्राट चित्रपट आस्वाद व साहित्याची भाषा आणि चित्रपटाची भाषा यावर आयोजित गटचर्चा


## अभिजात मराठी भाषा सप्ताहविषयक वृत्तांकन


'एसएमआरके'त मराठी विभागातर्फे कार्यक्रम


मातृभाषेविषयी न्यूनगंड नको!

डॉ. वृंदा भार्गवे यांचे प्रतिपादन


एसएमआरकेच्या वतीने अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त विविध उपक्रम

| | | |
|---|---|---|
| <br><br>दि. ४ ऑक्टोबर २०२५ रोजी नटसम्राट चित्रपटाच्या अनुषंगाने साहित्याची भाषा व चित्रपटाची भाषा यावर झालेला विद्यार्थिनी – प्राध्यापक संवाद | <br>दि. ६ ऑक्टोबर २०२५ रोजी मराठी शुद्धलेखन कार्यशाळेच्या आरंभी दीपप्रज्वलन करताना विभागप्रमुख डॉ. सायली आचार्य | <br><br>दि. ६ ऑक्टोबर २०२५ रोजी मराठी शुद्धलेखन कार्यशाळेच्या आरंभी ओमकाराच्या उच्चारावर मार्गदर्शन करताना डॉ. उज्ज्वला लांडगे |
| <br><br>दि. ६ ऑक्टोबर २०२५ रोजी मराठी शुद्धलेखन कार्यशाळेत भाषाविषयक विविध उच्चारण खेळ घेताना विभागप्रमुख डॉ. सायली आचार्य | <br><br>मराठी वाङ्मय मंडळाचे (भित्तीपत्रकाचे) उद्घाटन करताना मा. डॉ. वृंदा भार्गवे व प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर | <br>दि. ८ ऑक्टोबर रोजी अभिजात मराठी भाषा सप्ताह समारोपप्रसंगी डॉ. वृंदा भार्गवे यांच्या हस्ते मराठी विषयात विद्यापीठात पहिली आलेली विद्यार्थिनी सौ. सबिता देसले हिचा सत्कार |
| <br><br>समारोप प्रसंगी प्रास्ताविक व अतिथी परिचय करून देताना विभागप्रमुख डॉ. सायली आचार्य | <br>समारोप प्रसंगी मराठी भाषेबद्दल न्यूनगंड का या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. वृंदा भार्गवे | <br>समारोप प्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर |



मराठी भाषा सप्ताह समारोप प्रसंगी मान्यवरांसह सहभागी मराठी विभागाच्या गुणवंत विद्यार्थिनी व स्टाफ

| | | |
|---|---|---|
| डॉ. सायली आचार्य<br>मराठी विभागप्रमुख (प्र.) | डॉ. नितीन सोनगीरकर<br>उपप्राचार्य | डॉ. संध्या खेडेकर<br>प्राचार्या |